# व्याकरण

विद्यार्थ्यांच्या टप्प्यांमध्ये, शिकण्याच्या गतीमध्ये थोडाफार फरक असतो. तसेच काही घटकांची उजळणी दोन तीन वर्षे पुन:पुन्हा होणे दृढीकरणासाठी उपयोगी ठरते. हे लक्षात घेऊन व्याकरणातील काही घटकांविषयीचे तेच प्रश्न दोन किंवा तीन इयत्तांसाठी दिले आहेत.

**विरामचिन्हे**

**पूर्णविराम**

योग्य ठिकाणी पूर्णविराम देऊन वाक्ये पुन्हा लिही

१) मीना सकाळी उठली तिने दात घासले आणि अंघोळ केली तिने भाकरी खाल्ली ती शाळेत गेली
२) सुरेशची बकरी हरवली तो घाबरला आणि रडायला लागला झाडामागून बकरीचा आवाज आला सुरेशला आनंद झाला
३) लाल सिग्नल लागला सायकल थांबली रिक्षा थांबली बस थांबली सिग्नल हिरवा झाला सगळे निघून गेले
४) घंटा वाजली मधली सुट्टी झाली मुलांनी ताटे घेतली ती ओळीत उभी राहिली ताईंनी खिचडी दिली मुलांनी खिचडी खाल्ली
५) आजीचा मोबाईल वाजला रजियाने मोबाईल तिला नेऊन दिला आजी काकांशी बोलली मोबाईल अचानक बंद झाला काकांनी पुन्हा फोन केला

**प्रश्नचिन्ह व पूर्णविराम**

योग्य त्या ठिकाणी प्रश्नचिन्ह किंवा पूर्णविराम देऊन वाक्य पुन्हा लिही

१) दार वाजले कोण आले
२) किती वाजले शाळेची वेळ झाली का
३) बाजारात पोचलो कोणती भाजी घ्यायची भेंडी घ्यायची की वांगी
४) सारिका घसरून पडली तिला कोठे लागले फार दुखले का रक्त आले का
५) लग्नाला कोणाकोणाला नवीन कपडे करायचे आजच दुकानात जाऊ कोणत्या दुकानात जायचे
१) माझ्या दप्तरात वह्या पुस्तके कंपासपेटी पट्टी आणि रंगीत कागद आहेत